# जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
## तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचे समोर
(महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) अन्वये ठराव व दुरुस्ती)

---

वाचावे :-**महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) मधील तरतुद**

| | |
|---|---|
| १) पेमादेवी शेळी मेंढीपालन सहकारी संस्था मर्यादित, पेगिमरी, ता.संगमनेर | **अर्जदार** |
| २) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर | **प्रतिवादी क्रं.०१** |
| ३) उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर | **प्रतिवादी क्रं.०२** |

**(या बँकेची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२५ साठी दिनांक ७/०१/२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीतील मयत प्रतिनिधीचे नावात बदल करण्याबाबत नियम १० (४) नुसार प्राप्त झालेल्या ठरावा बाबतची सुनावणी)**

**प्रस्तावना -**

दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर या बँकेची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२५ साठीची निवडणुक प्रक्रिया सुरु झालेली असुन प्रस्तुत निवडणुक प्रक्रियेत बँकेची मतदारांची अंतिम मतदार यादी या कार्यालयामार्फत दिनांक ०७/०१/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद अर्जदार सभासद संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) नुसार त्यांचे दरम्यानचे काळात मयत झालेल्या प्रतिनिधीचे नाव बदलण्यासाठीचे ठराव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांचे कार्यालयाकडुन या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने सर्व संबधितांना या कार्यालयाने दिनांक २०/०१/२०२१ रोजी सुनावणी देऊन दाखल केलेल्या ठरावांची व कादपत्रांची पडताळणी केलेली आहे.

**निष्कर्ष व अभिप्राय –**

उपरोक्त अर्जदार पेमादेवी शेळी मेंढी पालन सहकारी संस्था मर्यादित, पेमगिरी, ता. संगमनेर या संस्थेने यापुर्वी बँकेच्या प्रारुप मतदार यादी वेळी श्री चांगदेव एकनाथ गोडसे यांचे नावाचा प्रतिनिधीचा ठराव दाखल केलेला होता तथापि, संस्थेचे प्रतिनिधी श्री गोडसे यांचे निधन झाल्याने संस्थेने निवडणुक नियम १० (४) नुसार नविन ठराव दाखल केलेला असुन त्याअन्वये श्री अवतार रावसाहेब डुबे यांचे नावाचा नविन ठराव दाखल केलेला आहे. याबाबत खात्री केली असता, उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी सादर केलेल्या अभिप्रायानुसार संस्थेच्या ठरावासोबत जोडलेल्या सभा अजेंडा व इतिवृत्त तपासले असता, अजेंडयामध्ये सभेचा दिनांक ०७/०१/२०२१ असा नमुद केलेला आहे मात्र सभेच्या इतिवृत्तात ही सभा दिनांक ०८/०१/२०२१ रोजी संपन्न झाली असल्याचे दिसुन येत आहे. सभेच्या दिनांकाबाबत विरोधाभास असल्याचे कारण देऊन श्री अवतार रावसाहेब डुबे यांचे नाव अंतिम मतदार समाविष्ट करणे उचित होणार नाही असे अभिप्राय नोंदविलेले आहे. सुनावणी दरम्यान संस्थेचे उपस्थित प्रतिनिधी श्री रावसाहेब गोपाळा डुबे यांचेकडील मुळ अजेंडा व इतिवृतत नोंदवही तपासले असता सभा दिनांकात विरोधाभास आढळुन आल्याने नविन प्रतिनिधी निवडीबाबतची सभा अजेंडयात नमुद दिनांकास झालेली नसल्याने श्री अवतार रावसाहेब डुबे यांचे नाव नविन प्रतिनिधी म्हणुन अंतिम मतदार यादीत समाविष्ट करणे कायदेशीर ठरत नसल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे

-कृ.मा.प..

## - आदेश -

मी डॉ ज्योती लाठकर, जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक मला महराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त् अर्जदार संस्थेंचा ठराव अमान्य करण्यात येत आहे.

( ज्योती लाठकर )
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

**स्थळ – नाशिक**
**दिनांक – २०/०१/२०२१**

जा.क्र.वि-३/एडीसीसीबँक/नियम १०(४)/निर्णय/२०२१
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक
विभाग, नाशिक यांचे कार्यालया, तिसरा मजला,
गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, नाशिक
दिनांक -- २०/०१/२०२१

**प्रत –**

१. अर्जदार / प्रतिवादी.
२. निवडणुक निर्णय अधिकारी दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅक लि., अहमदनगर तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर

२/- उक्त आदेशाची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –**

१) जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अहमदनगर